
# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

ISSN 2319-8648 | Impact Factor - 7.139 | Indexed (SJIF)

Oct. 2021 Special Issue- 43 Vol. I

## स्वातंत्र भारताचे
## अमृत महोत्सव वर्ष : एक चिंतन




**Chief Editor**

**Mr. Arun B. Godam**

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 43, Vol. 1
Oct. 2021

Peer Reviewed
SJIF

ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 7.139

# Index

1. Eco-consciousness of the Tribals in Gopinath Mohanty's Paraja — 7
**Dr. Shriram Trimbak Dongre**

2. Rural Health Services of Hingoli District in Maharashtra — 10
**Dr. Shivaji F. Bothikar**

3. The Arab Spring and Its Implications for India — 14
**Rameshwar Kaduba Sahane**

4. HOW DOES TECHNOLOGY AFFECT ON THE SOCIETIES IN THE TWENTY-FIRST CENTURY? — 17
**Mohammed ilyas Mohammed aqueel**

5. Economist Dr. Babasaheb Ambedkar — 22
**Gautam Vikram Bhalerao**

6. ग्रामीण आरोग्य व्यवस्थेची वास्तविकता : एक अभ्यास — 25
डॉ. रमेश वाघमारे

7. स्वतंत्र भारतातील आदिवासींच्या आर्थिक व शैक्षणिक समस्या आणि त्यांच्या पुढील आव्हाने — 28
**Dr. Phole Kamal Bhaurao**

8. प्रादेशीक मागासलेपन आणि –नक्षलवाद — 33
प्रा.डॉ.गशेश सोळूंके

9. भारतीय लोकशाही समोरील आव्हान : नक्षलवाद — 35
रामेश्वर कडूवा सहाने

10. ग्वालियर जिले के सहरिया आदिवासियों का समूह एक चिन्तन — 37
डॉ. कीर्तिबाला वर्मा

11. भारतातील आदिवासी समूह - एक चिंतन — 40
सारिका मेघराज घाडगे.

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 43, Vol. 1<br>Oct. 2021 | Peer Reviewed<br>SJIF | ISSN : 2319 - 8648<br>Impact Factor : 7.139 |
|---|---|---|

# स्वतंत्र भारतातील आदिवासींच्या आर्थिक व शैक्षणिक समस्या आणि त्यांच्या पुढील आव्हाने

**Dr. Phole Kamal Bhaurao**
Asst. Professor & Head, Dept. of Commerce, D. B. College, Bhokar Tq. Bhokar Dist. Nanded

**प्रस्तावना:**

महाराष्ट्रात सध्या अकरा जिल्ह्यातील 48 तालुक्यातील पाच हजार 809 गावे आदिवासी उपयोजना क्षेत्रात समाविष्ट आहेत आदिवासी उपयोजनेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठी अर्थसहाय्य केंद्र सरकारकडून दिले जाते आदिवासी उपयोजना क्षेत्राची निर्मिती झाल्यानंतर आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी गरजेनुसार क्षेत्र विकासाच्या तसेच वैयक्तिक लाभाच्या योजना राबविण्याचे शासनाने ठरविले. यासाठी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प निर्माण करण्यात आले. आदिवासींचे वास्तव्य असलेल्या भागाची भौगोलिक स्वरूप, नैसर्गिक साधनसंपत्ती, आर्थिक उत्पन्नाच्या बाबी, सामाजिक संरचना व चालीरीती तसेच लोकांच्या गरजा इत्यादी बाबी लक्षात घेऊन प्रत्येक एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे कार्यक्षेत्र निश्चित करण्यात आले.

साधारणतः तीनशे ते चारशे पन्नास गावांचा एक अशाप्रकारे निरनिराळे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प निर्माण करण्यात आले. महाराष्ट्रात सध्या एकूण २४ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यरत असून त्यापैकी २१ एकाच आदिवासी क्षेत्रात तर ३ प्रकल्प आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर आहेत.

**सद्यस्थिती:**

आज आदिवासी समाज हा शिक्षणाच्या प्रवाहात काही अंशी आलेला दिसून येतो, हा समाज प्रगतीसाठी व सामाजिक विकासासाठी धडपड करताना दिसतो आहे आदिवासी मुले उच्च शिक्षण व्यावसायिक व तांत्रिक शिक्षण आणि रोजगाराची स्वप्ने पाहतो आहे, पण तरीही हव्या त्या प्रमाणात आजही हा समाज पुढे येताना दिसत नाही. राजकारणात, प्रशासनात या समाजातील क्वचितच एखादी व्यक्ती समोर आलेली दिसते. आजही या समाजाच्या विकासाच्या धडपडी बरोबर हा समाज अनेक समस्यांना तोंड देत असलेला आपणास पाहावयास मिळतो.

आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक क्षेत्रात पुढे जाताना अनेक सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि त्याहीपुढे जाऊन अनेक ठिकाणी मुलींना व स्त्रियांना लैंगिक समस्यांनाही सामोरे जावे लागते. अशा अनेक समस्यांवर विचार होणे,व त्यावर काय उपाय करता येतील हा विचार होणे क्रमप्राप्त ठरते म्हणूनच सुरुवातीस आपण आदिवासी समाजातील विद्यार्थी तसेच शेतकरी वर्ग आणि व्यावसायिक वर्ग यांना येणाऱ्या समस्या बद्दल जाणून घेत त्यानंतर नेमके काय उपाय करता येतील याचा विचार करू.

**संशोधन अध्ययनाचे महत्त्व:**

आआदिवासींची शैक्षणिक स्थिती तथा त्यांच्या समस्या याबाबत अभ्यास करताना आदिवासींची क्षमता व आदिवासी भागांमध्ये असणाऱ्या सोयी सुविधा याबाबत माहिती घेणे आवश्यक आहे. इतर समाजाच्या तुलनेत नागरी समाजाच्या मानाने आदिवासी मध्ये कोणत्या गोष्टींची कमतरता आहे याबाबत अभ्यास करणे हे महत्त्वाचे ठरते. आदिवासींच्या शिक्षण विषयक नेमक्या समस्या कोणत्या आहेत व त्यावर काय उपाय करता येईल हे अभ्यासणे हे या संशोधन अध्ययनात अपेक्षित आहे.

**संशोधन अध्ययनाची उद्दिष्टे:**

१. आदिवासींच्या प्रश्नासंबंधी पूर्ण माहिती गोळा करणे
२. आदिवासींची शैक्षणिक स्थिती जाणून घेणे
३. आदिवासींचे प्रश्न सर्व समाज तथा शासनापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करणे
४. आदिवासी विकासाबाबत असलेल्या शासकीय योजना जाणून घेणे

Special Issue 43, Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
Oct. 2021 | SJIF | Impact Factor : 7.139

५. आदिवासींच्या शैक्षणिक विकासाबाबत नेमक्या काय उपाययोजना करता येतील यासाठी मार्गदर्शक सूचना व शिफारशी करणे.

गृहीतकृत्ये:

१. आदिवासींच्या विकास योजनांचा शासकीय हव त्या प्रमाणामध्ये लाभ होत नाही

२. आदिवासींमध्ये प्रभावी संघटना व नेतृत्वाचा अभाव आहे

३. आदिवासी भागामध्ये शैक्षणिक विकास तथा आधुनिकीकरणाचा अभाव आहे.

आदिवासींच्या आर्थिक व शैक्षणिक समस्या:

१. आदिवासी समाज हा अतिशय दुर्गम व डोंगराळ भागात वास्तव्यास आहे.

२. अशा दुर्गम भागांमध्ये लाईट, पाणी, रस्ते व आरोग्यविषयक सुविधांचा अभाव आढळून येतो.

३. राज्यभर जवळपास पाचशेच्या वर आश्रम शाळा आहेत परंतु इथे येणारा आदिवासी विद्यार्थी मात्र आपल्या हलाखीच्या परिस्थितीमुळे बरेचदा केवळ पोटार्थी म्हणून येत असतो.

४. अशा आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना पुरेसे अन्न व पोषण आहार दिला जात नाही.

५. विद्यार्थ्यांच्या आरोग्याकडे फारसे लक्ष दिले जात नाही.

६. विद्यार्थिनींच्या लैंगिक शोषणाचा तितकाच गंभीर आणि सुन्न करणारा विषय तर आहेच.

७. कमालीचे आर्थिक दारिद्र्य दिसून येते.

८. खऱ्या आदिवासींना शासकीय योजनांचा व दिल्या जाणाऱ्या सोयीसुविधांचा प्रत्यक्ष लाभ न होता इतर व्यक्तींना या सर्व बाबींचा लाभ होताना दिसतो.

९. आज राज्यभर जवळ जवळ 150 च्यावर आदिवासी समाजाचे लोकप्रतिनिधी आहेत परंतु काही बोटावर मोजण्याएवढे लोकप्रतिनिधी सोडले तर ते समाजासाठी समाज कार्य हा उद्देश समोरं ठेवून आपली जबाबदारी पार पाडण्याऐवजी केवळ पक्षाची गुलामी करतानाच दिसून येतात.

१०. सुशिक्षित बेरोजगारी, आर्थिक पाठबळाचा अभाव, शहराच्या ठिकाणी वास्तव्याची वानवा तसेच इतर समाजातील व्यक्तींचा आदिवासी प्रति असलेला भेदभाव, द्वेष व हेवा यामुळे आदिवासींमध्ये येणारी संकुचित मनोवृत्ती.

११. सरकारी यंत्रणांची साथ मिळत नाही, असलेल्या योजनांच्या वाटपाबाबत काही न बोललेलेच बरे कारण इथे वाढप्यांच्या आधीच झोळ्या फाटलेल्या, त्यात राहिलेच काही शिल्लक तर ते आदिवासी समाजातील गरजू पर्यंत येईल. परंतु तेही लाभार्थ्यांच्या शर्थीच्या प्रयत्नांती.

१२. विकासाच्या नावावर आदिवासी गोर गरीब कुटुंबांचे होऊ घातलेले स्थलांतर व त्यामुळे उद्भवणारे अनेकविध प्रश्न.

१३. नोकर भरतीतील अनेक घोटाळे, पैशांचे उघडपणे होणारे व्यवहार आणि त्यामुळे गरीब होतकरू मागास तथा आदिवासी समाजातील वाढत जाणारी सुशिक्षित बेरोजगारी.

१४. उच्च शिक्षण, व्यावसायिक शिक्षण, तांत्रिक शिक्षण त्याच बरोबर एम. फिल. व पीएच. डी. सारख्या संशोधन करणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना फेलोशिप अथवा बेकार भत्ता ही वेळेवर दिला जात नाही.

१५. लाईट, रस्ते, पाणी तसेच आरोग्यविषयक सुविधांचा अभाव तर आहेच परंतु त्याही बरोबर, व्यावसायिक व तांत्रिक शिक्षणासाठी आदिवासींमध्ये तितकीशी जागृती झालेली दिसून येत नाही.

या आणि अशा अनेक समस्यांना तोंड देत आजचा आदिवासी हा आपले जीवन व्यतीत करत असताना दिसून येतो.

उपाय:

-आदिवासी समाजातील गोरगरीब मुलांना जमेल त्या पद्धतीने शिक्षण देण्यासाठी प्रयत्न करणे.

- उदा: कोसबाडच्या 'बाल ग्राम शिक्षण केंद्र' या आदिवासी मुलांच्या शाळेत जसे सिंधुताई अंबिके यांनी शिक्षिका म्हणून दीर्घकाळ काम केले, सेवानिवृत्तीनंतर वयाची 80 वर्ष उलटून गेल्यानंतरही सिंधुताई या ताराबाई मोडक आणि अनुताई वाघ यांचा वारसा पुढे चालवत राहिल्या आणी त्यांनां 'उत्तुंग सांस्कृतिक परिवारातर्फे' उमा महादेव स्मृती आदिवासी सेवानिवृत्ती पुरस्काराने 14 डिसेंबर रोजी सन्मानित करण्यात आले. त्यांचा आलेला अनुभव हा पुढील प्रमाणे सांगता येईल

१. आदिवासी बालक आणि त्यांचे पालक किंबहुना संपूर्ण आदिवासी समाज हा कमी बोलणारा असल्याचे निदर्शनास येते.

२. त्यांना पोटभर अन्न आणि पुरेशे वस्त्र हि परिधान करण्यास मिळत नव्हते.

३. व्यसनाधीनता मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसून येते.

४. वीज नव्हती, रस्ते नव्हते, दूषित पाणी प्यावे लागे आणि हाताला कामही नव्हते.

५. तंत्रज्ञान काय असते आणि त्याचा वापर कसा व कशासाठी केला जातो याची पुसटशीही कल्पना येथील आदिवासींना नव्हती.

६. अन्नासाठी कित्येक वेळा लैंगिक शोषणाला बळी पडावे लागे.

या आणि अशा सर्व समस्या वर गांभीर्याने विचार होणे व या समस्या सोडविण्यासाठी शासकीय स्तरावरून तसेच सामूहिकरीत्या प्रयत्न होणे अनिवार्य आहे.

यासाठी,पेसा आणि अॅट्रॉसिटी यासारख्या कायद्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी यासाठी सर्व स्तरातून प्रयत्न होणे अनिवार्य आहे.

आदिवासी समाजातील मुलींसाठी मुबलक प्रमाणात शिक्षणाच्या व रोजगार विषयक संधी उपलब्ध करून द्याव्यात, स्त्री-पुरुष हा भेद टाळला जावा त्याच बरोबर स्त्री अथवा एक मुलगी म्हणून होणारे आघोरी संस्कार यावर आळा बसावा. पुरुष वर्गाकडून स्त्रियांना शिक्षण, समाज व राजकारणात पुढे येण्यासाठी प्रोत्साहन दिले जावे, तिच्या मनातील सुरक्षिततेची भावना बळकट व्हावी यासाठी स्त्रीयांचा यथोचित सन्मान केला जावा.

लोकप्रतिनिधींनी आपल्या दुर्गम भागातील वास्तव्यास असलेल्या समाजाच्या विकासासाठी सुविधा मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करावा. त्याचबरोबर शासनाच्या विविध योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम आदिवासी सुशिक्षित वर्गामार्फत व्हावे. जो आदिवासी आहे किंवा स्वतःला आदिवासी म्हणवून घेतो त्याने आदिवासी कायद्यांची माहिती जाणून घेण्यासाठी प्रयत्न करावेत आणि कायद्यांचा अभ्यास करून समाजोपयोगी भूमिका ठेवावी. आदिवासी लोककला संस्कृती व लोकसाहित्याचे संरक्षण व संवर्धन करावे.

वेगवेगळ्या स्तरातून वेगवेगळ्या क्षेत्रातून शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या समस्या जाणून घेऊन समाजातील लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी वर्गाने त्या सोडविण्यासाठी यथासायास प्रयत्नशील असावे. उदाहरणार्थ: आदिवासी मुलींच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष देत तिला आत्मनिर्भर बनण्यासाठी सहाय्यक भूमिका घेणे, आदिवासी आश्रम शाळेत वस्तीगृहात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आरोग्य विषयी सुविधांची वेळोवेळी पाहणी करून योग्य त्या उपाययोजना कराव्यात. आदिवासी विद्यार्थी प्रतिनिधींनी आपल्या विद्यार्थ्यांना आदिवासी विद्यार्थ्यांसाठी किंवा विद्यार्थ्यांच्या विकासासाठी असलेल्या अनेक सोयी सुविधा व विकास योजना याबाबत माहिती दिली जावी. आदिवासी आरक्षित जागांवर नियुक्त झालेल्या व वेगवेगळ्या कार्यक्षेत्रात कार्य करणाऱ्या कर्मचारी वर्गाने आपण ज्या ठिकाणी आपले कर्तव्य बजावत असतो त्या ठिकाणी आपल्या संपर्कात व निदर्शनास येणाऱ्या आदिवासी समस्यांना वाचा फोडण्याचा व उपाय करण्याचा यथासायास प्रयत्न करावा. आदिवासींच्या शेती विषयक आरोग्यविषयक शिक्षण विषयक समस्या जाणून घेऊन त्यावर योग्य ते उपाय शोधण्याचा प्रयत्न करणे व या सुविधा सरकार मार्फत कार्यान्वित करून घेणे. आदिवासींच्या शैक्षणिक योजनांबाबत च्या संपूर्ण माहितीचा प्रचार व प्रसार योग्य पद्धतीने करणे.

**आदिवासींच्या काही आर्थिक व शिक्षण विषयक शासकीय योजना:**

आदिवासींच्या आर्थिक आणि शैक्षणिक समस्यांचा विचार करत असताना त्यावर केल्या जाणाऱ्या उपायांच्या संदर्भाने शासकीय स्तरावर राबविल्या जाणाऱ्या काही विशिष्ट व ठळक आर्थिक व शैक्षणिक योजना पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. आदर्श आश्रम शाळा योजना.

२. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यानिकेतन च्या धर्तीवर विशेष स्वरूपाची शाळा.

३. एकलव्य इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळा. (केन्द्र पुरस्कृत पब्लिक स्कूल्स)

४. आदिवासी मुला मुलींसाठी शासकीय वसतिगृहे.

५. आदिवासी विद्यार्थ्यांना शालांत परीक्षा शिष्यवृत्ती योजना. (आदिवासी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे व त्यांना तो खर्च भागविता यावा यासाठी तरतूद)

६. आदिवासी विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता योजना: (आर्थिक दृष्ट्या मागास असलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांना त्यांना लागणाऱ्या जादा खर्चाची तडजोड करता यावी यासाठी)

७. दर्जेदार शासकीय अनुदानित आश्रम शाळांना विशेष प्रोत्साहनपर बक्षीस योजना. (पाच लाख, तीन लाख, दोन लाख रुपये) उद्देश: आश्रमशाळांच्या कामकाजात गुणात्मक बदल व्हावा, दर्जेदार शिक्षण मिळावे, शाळेचे वातावरण व कामकाज यात कर्मचाऱ्यांचा सहभाग वाढीस लागावा त्याचबरोबर आश्रमशाळांमध्ये उत्कृष्ट सुविधा देण्याबाबत स्पर्धा निर्माण व्हावी व चांगले काम करणाऱ्या शाळांची दखल घेतली जावी.)

८. आदिवासी मुलींमधील गळती थांबवण्यासाठी प्रोत्साहनपर भत्ता योजना: सन २००३-०४ पासून लागू.

९. राज्यातील सर्व विद्यार्थ्यांसाठी अपघात विमा योजना.

१०. आदिवासी विद्यार्थी व युवकांसाठी केंद्र पुरस्कृत व्यवसाय प्रशिक्षण केंद्र योजना:

११. स्पर्धा परीक्षा व स्पर्धा पूर्व प्रशिक्षण योजना.

१२. अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी योजना.

१३. स्वयंरोजगारासाठी कर्ज पुरवठा योजना, इत्यादी.

अशाप्रकारे शासकीय स्तरावर देखील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व आर्थिक समस्या सोडविण्यासाठी अनेक प्रकारे प्रयत्न होताना दिसतात.

**आव्हाने:**

काळाच्या विविध टप्प्यावर निर्माण झालेल्या शिक्षणाच्या पद्धतीने एकूणच शिक्षण व्यवस्थेत सकारात्मक बदल घडविले आहेत. परंतु तरीही आजही आदिवसी समाजापुढे अनेक आव्हाने असलेली आपल्या निदर्शनास येतात. काही आव्हानांचा उल्लेख या ठिकाणी केलेला आहे तो पुढील प्रमाणे:

- भूतकाळातील चांगले ते स्वीकारून, स्मरून उत्तम व उज्वल भविष्याच्या निर्मितीसाठी वर्तमानाच्या कर्मावर भर देणे व या दृष्टीने येणाऱ्या भविष्यातील आव्हाने शिक्षणाच्या सहाय्याने पेलण्यास समर्थ बनणे,
- आदिवासी विद्यार्थ्यांनी स्वावलंबी तथा आत्मनिर्भर बनवणे
- शिक्षण हे सर्व समस्या सुधारणेचे मूळ आहे हे जाणून घेऊन समाज सुशिक्षित करणे व स्वतः उत्कृष्ट शिक्षणाचा ध्यास घेऊन कष्ट करणे.
- शिक्षणाबरोबरच आपला सांस्कृतिक वारसा जोपासणे व त्याचे संवर्धन करणे हे आदिवासी पुढील प्रमुख आव्हान आहे.
- आदिवासी लोककला लोकसाहित्य अबाधित ठेवणे.
- स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन देणे व त्यांच्या सुरक्षितता व सबलीकरणासाठी भक्कम आधार निर्माण करणे.
- बालमजुरी बालविवाह व व्यसनाधीनता यासारख्या समस्या उद्भवणार नाहीत यासाठी लोकांमध्ये शिक्षणाविषयी आस्था व जागरूकता निर्माण करणे.

- आदिवासी आश्रम शाळा व वसतिगृहात राहणाऱ्या मुलींचे होणारे लैंगिक शोषण यावर आळा बसेल यासाठी प्रयत्न करणे.
- आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना आधुनिक व तांत्रिक शिक्षण घेण्यास प्रवृत्त करून विकासाच्या प्रवाहात आणणे.
- समाजातील गरीब, होतकरू, हुशार व गरजू विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना योग्य प्लॅटफॉर्म मिळवून देणे.
- शिक्षणाबरोबरच आपले कुटुंब, आई-वडील, समाज यांच्या गरजा जाणून घेत त्या कशा भागवता येतील याचाही विचार करणे.
- उच्च शिक्षण, व्यावसायिक शिक्षण, तांत्रिक शिक्षण, संशोधन कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सरकारच्या विविध योजनांचा लाभ मिळविण्यासाठी योग्य मार्गाने प्रयत्न व पाठपुरावा करणे.
- अनुसूचित जमातीच्या आरक्षण धोरणाचा सन्मान व संरक्षण व्हावे यासाठी जागरूक राहणे.
- बोगस आदिवासी त्याचबरोबर जातचोर निदर्शनास आल्यास अशा लोकांची वेळीच माहिती घेऊन तसे प्रशासनाच्या निदर्शनास आणून देणे.
- आदिवासी विद्यार्थ्यांच्या आर्थिक व शैक्षणिक न्याय्य हक्क व मागण्यांसाठी आदिवासी कर्मचारी वर्ग, विविध सामाजिक संघटना व लोकप्रतिनिधी यांनी पुढे येऊन लढा उभारणे व सामाजिक न्याय प्रस्थापित करणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष:**

स्वातंत्र्यानंतर शासनाने आदिवासींसाठी आश्रम शाळा उघडल्या या शाळांमधून विद्यार्थ्यांना निवास, भोजन, कपडे पुस्तके देण्यात येऊ लागली. परंतु त्यांचा दर्जा फारसा चांगला नसल्याने त्यातून शिक्षणाच्या विकासाला वाव मिळालेला नाही. परंतु त्यातून शिक्षणाच्या प्रसाराला संधी मात्र मिळाली. शासनाने या मुलांसाठी उच्च शिक्षणाची व्यवस्था केली. शिष्यवृत्या देण्यात येऊ लागल्या. विशेष मार्गदर्शन करण्यात आले. या सर्व प्रयत्नांतून आदिवासी भागात साक्षरतेत वाढ झाली. परंतु उच्च शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण फारच कमी दिसून येते. तसेच प्राथमिक स्तरात गळतीचे प्रमाण फार मोठे आहे. शैक्षणिक जागृतीचा अभाव, लहान मुलांचा अर्थउत्पादनात असलेला वाढीस, लहान भावंडांचा सांभाळ करण्याची जबाबदारी, त्यागी शिक्षकांचा अभाव, शिक्षणाचे माध्यम आदिवासी भाषेतील पाठ्यपुस्तकांची अनुपलब्धता, आदिवासी जीवनाशी शिक्षणाचा संदर्भ नाही ही धारणा या सारख्या अनेक कारणामुळे या क्षेत्रात साक्षरता आणि उच्च शिक्षणाचे प्रमाण नगण्य आहे. म्हणून म्हणावे लागते की, अद्यापही अतिशय दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी मध्ये शैक्षणिक तथा आर्थिक विकास आणि आधुनिकीकरणाची कोणतीही चिन्हे दिसत नाहीत.

**सूचना व शिफारशी:**

१. आदिवासींच्या विकासाबाबत असलेल्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी होणे,अनिवार्य आहे.
२. उच्च शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती कथाउच्च शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती तथा फेलोशिप सारख्या सुविधांचा योग्य वेळेत लाभ होईल असे प्रयत्न होणे अनिवार्य आहे.
३. प्राथमिक स्तरावरील गळतीचे प्रमाण थांबवण्यासाठी ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे.
४. आदिवासी व दुर्गम भागांमध्ये भौतिक सुविधा व आधुनिक शिक्षणाच्या सोयींची उपलब्धता करून देणे अनिवार्य आहे.
५. अभ्यासक्रमामध्ये आदिवासी जीवना बाबतचा संदर्भ असणे अनिवार्य आहे.
६. आदिवासी विद्यार्थ्यांच्या आर्थिक व शैक्षणिक न्याय्य हक्क व मागण्या पूर्ण करण्यासाठी विशेष उपाययोजना करणे अनिवार्य आहे.

**संदर्भ:**

१. इंटरनेट वेबसाईट्स
(http://lib.unipune.ac.in:8080/jspui/bitstream/123456789/9699/8/08_chapter2.pdf)
२. स्व निरीक्षणे
३. वर्तमानपत्रे